ठराव क्रमांक १७(८) - मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेची रोख मोठ्या प्रमाणावर संकलीत होत असल्याने रिझर्व बँक ऑफ इंडिया, इश्यु डिपार्टमेंट, नागपूर येथे बँकेचे गॅरंटी खाते उघडण्यांत यावे त्याकरिता आवश्यक असणारा गॅरंटी बँक बॉंड सरव्यवस्थापकांनी आपल्या सहीनिशी रिझर्व बँकेला सादर करावा लागणार आहे. या गॅरंटी बॉंड अंतर्गत जमा करण्यांत येणाऱ्या रोखचे सर्व व्यवहार डिपॉजिट अकाउंट डिपार्टमेंट, रिझर्व बँक ऑफ इंडिया यांना आधिच पॉवर ऑफ अटर्नी दिलेल्या कोणत्याही दोन अधिकाऱ्यांच्या सहीनिशी करण्यांत यावेत. याकरिता खालिलप्रमाणे रिझर्व बँकेला ठराव करुन द्यावा लागेल.

– RESOLUTON –

"This meeting of Board of Directors of The Nagpur District Central Cooperative Bank Ltd., Nagpur, held on date 19.12.2000 at Nagpur resolves to open an account of cash deposits under guarantee with Issue Department of Reserve Bank of India, Nagpur. The Board hereby authorises General Manager of the Bank to sign the Guarantee Bond in format CD 46 required for the purpose. The guarantee operations shall be carried out by any two officials of the authorised officers whose signatures are also covered under power of attorney submitted to Deposit Accounts Department of Reserve Bank of India, Nagpur.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

यानंतर सभेसमोर कोणतेही विषय नसल्याने सभेचे कामकाज व्यवस्थीत पार पाडण्यास सहकार्य केल्याबद्दल सभेला उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे मा० अध्यक्ष यांनी जाहिर केले.

सरव्यवस्थापक      अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल कोऑप. बँक लिमी., नागपूर.

बँकेच्या मा. संचालक मंडळाची सभा मंगळवार दिनांक १३.२.२००१ रोजी दुपारी २.०० वाजतां बँकेच्या मुख्य कार्यालयातील "सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहांत बँकेचे अध्यक्ष मा. श्री. सुनिल केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यांत आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित

| | |
|---|---|
| १. मा. श्री. सुनिल केदार | अध्यक्ष |
| २. मा. सौ. आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| ३. मा. श्री. र. पां. गावंडे | संचालक |
| ४. मा. श्री. श्या. चं. शहाणे | " |
| ५. मा. श्री. अ. रा. गुप्ता | " |
| ६. मा. श्री. व. श्या. वांढे | " |
| ७. मा. श्री. अ. य. गुजर | " |
| ८. मा. श्री. चं. ल. कोल्हे | " |
| ९. मा. श्री. आ. र. देशमुख | " |
| १०. मा. श्री. सं. लि. चोरे | " |
| ११. मा. श्री. शा. ग. धवड | " |
| १२. मा. श्री. वि. रा. हुलके | " |
| १३. मा. श्री. वि. वि. निमजे | " |
| १४. मा. श्री. ग. के. शाहिर | " |
| १५. मा. श्री. मो. वि. निमजे | " |
| १६. मा. श्री. र. व्यं. निमजे | " |
| १७. मा. श्री. अ. शं. धार्मिक | " |
| १८. मा. सौ. सिताताई कुंभारे | संचालीका |
| १९. मा. सौ. कुसुमताई किंमतकर | " |
| २०. मा. श्री. अ. ना. पोरड्डीवार, प्रतिनिधी, म. रा. सह. बँक म. मुंबई. | |
| २१. मा. श्री. एस. बी. पाटील, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर. | |
| २२. मा. श्री. एल. जी. चौधरी | कर्मचारी प्रतिनिधी |
| २३. मा. श्री व्ही. जी. शहाणे | " |
| २४. मा. श्री. ए. एन. चौधरी | सरव्यवस्थापक |

अनुपस्थित

| | |
|---|---|
| १. मा. श्री र. गो. बंग | संचालक |
| २. मा. श्री. मा. र. ओंभकाटे | " |

३.मा.श्री. वि.आ.राऊत संचालक
४.मा.श्री.ब.भा.तायवाडे "
५.मा.श्री.मु.भि.पन्नासे "
६.मा.श्री व.क.पाराशिवनीकर "
७.मा.श्री.चं.तु.समर्थ "
८.मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद, नागपूर
९.मा.विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सह.संस्था (बँक), नागपूर.
१०.मा.सहाय्यक महाप्रबंधक, नाबार्ड, नागपूर.
११.मा.विभागीय अधिकारी, म.रा.सह.बँक म.विभागीय कार्यालय, नागपूर.

---

विषयपत्रिकेवरील विषयानुसार सभेच्या कार्यवाहीस सुरुवात करण्यापूर्वी बँकेचे मुख्याधिकारी श्री अनंतराव रामचंद्र गवळी यांचे दिनांक १९जानेवारी २००१ रोजी निधन झाले. दिनांक २६जानेवारी २००१ रोजी गुजरात राज्यांत महाभयंकर प्रलयकारी झालेल्या भुकंपामुळे फारमोठ्या प्रमाणावर वित्तहानी व लाखाच्या जवळपास लोक मृत्युमुखी पडले. याबाबत सभेला माहिती देऊन दोन मिनिटे उभे राहून मृतात्म्यांना मुक श्रध्दांजली अर्पण करण्यास मा.अध्यक्ष यांनी आवाहन केले. सभेत दोन मिनिटे उभे राहून मुक श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली व दुःखवट्याचा ठराव खालिल प्रमाणे पारित करण्यांत आला.

<u>दुःखवट्याचा ठराव</u>

दिनांक १९जानेवारी २००१ रोजी बँकेचे मुख्याधिकारी श्री अनंतराव रामचंद्रराव गवळी यांचे दुःखद निधन झाले. त्यांचे निधनामुळे त्यांचे कुटुंबियावर ओढवलेल्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. २६ जानेवारी २००१ रोजी गुजरात राज्यांत महाभयंकर प्रलयकारी भुकंपामुळे तेथिल जनजीवन उध्वस्त, विस्कळीत झालेल्या कुटुंबीयांचे व मृत पावलेल्या लोकांच्या कुटुंबीयांचे दुःखात आम्ही सहभागी आहोत. मृत पावलेले बँकेचे अधिकारी श्री अनंतराव रामचंद्रराव गवळी व भुकंपामुळे मृत पावलेल्या लोकांच्या आत्म्यास परमेश्वर शांती आणि सद्‌गती देवो ही प्रभुचरणी प्रार्थना"

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयानुसार सभेच्या कार्यवाहीस सुरुवात करणेपूर्वी सभेला अनुपस्थित असलेले संचालक श्री. र.गो.बंग, श्री बा.र.जांभुळकर, श्री वि.आ.राऊत, श्री.ब.भा.तायवाडे

श्री. मु. शि. पन्नासे, श्री. व. क. पारशिवनीकर, व श्री. चं. तुरसमर्थ यांचे अनुपस्थितीची सभेत नोंद घेण्यांत आली व त्यांना अनुपस्थितीची रजा मंजुर करण्यांत आली.

---

विषय क्रमांक १ – मागील दिनांक १९.१२.२००० रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत कायम करणे.

ठराव क्रमांक १ – मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर चर्चा करतांना ठराव क्र. १८ मध्ये भिवापूर येथे कृषि उत्पन्न बाजार समितीची ५००० चौरस फुट जागा रुपये २.०० लाख किंमतीत ५० वर्षांचे लिजवर घेण्यांत यावी असे ठरले होते. तथापी भिवापूर तालुका सुपरविजन सोसा. व सहाय्यक निबंधक सह. संस्था भिवापूर यांनी सुध्दा बँकेच्या नियोजीत स्वमालकीचे जागेत त्यांना जागा मिळावी अशी विनंती केल्यामुळे ५००० चौ. फुट ऐवजी भिवापूर बाजार समितीची सलग १०८९० चौ. फुटाचा संपूर्ण प्लॉट खरेदी करुन तालुका स्तरावर चांगली इमारत बांधण्यांत यावी व तशी दुरुस्ती ठरावांत घेण्यांत यावी, असे मा० अध्यक्ष यांनी सुचविले.

विषयावर सविस्तर चर्चा होवुन दिनांक १९.१२.२००१ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत सर्वानुमते दुरुस्तीसह कायम करण्यांत आले.

---

विषय क्रमांक २ – मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ – मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मागील दिनांक १९.१२.२००० रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती मा० सरव्यवस्थापक यांनी थोडक्यांत दिली. मा० सरव्यवस्थापक यांनी दिलेल्या माहितीवरुन ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ३ – मे. दिनशॉ डेअरी फुडस् प्रा. लि. नागपूर यांनी मशिनरी खरेदीकरिता महाराष्ट्र राज्य सह. बँक मर्या. मुंबई येथे अँडव्हान्स रक्कम व आय एल सी सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत दिनांक २२.१२.२००० रोजी केलेल्या सर्क्युलर ठरावास मान्यता देणे.

ठराव क्रमांक ३ – मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले, विषयावर सविस्तर चर्चा होवुन मे. दिनशॉ डेअरी फुडस् प्रा० लिमी. नागपूर यांना

मशिनरी खरेदीकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या. मुंबई येथे ॲडव्हान्स रक्कम व आयएल.सी. सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत दिनांक २२.१२.२००० रोजी खालील प्रमाणे केलेल्या सक्युलर ठरावास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

"दिनांक २२.१२.२००० रोजीचा सक्युलर ठराव"

"मे. दिनशॉ डेअरी फुडस प्रा.लिमी. ह्यांना त्यांच्या बुटीबोरी एम.आय.डी.सी. येथे नविन प्लॅन्ट उभारण्याकरिता विदेशातून माशिनरी आयात करायची आहे. मशिनरी किंमतीचे ३०% ॲडव्हान्स पेमेंट राज्य बँकेमार्फत विदेशातील पुरवठादारांना त्वरित पाठवायचे असून मशिनरी किंमतीचे उर्वरित ७०% पेमेंटकरिता महाराष्ट्र राज्य सह. बँक लि. मुंबई येथे एल.सी. (Letter of Credit) अकाउंट उघडून व्यवहार करावयाचे आहे व याकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला हमी द्यावयाची असून याकरिता सदर कंपनीने आपणां कडे अर्ज सादर केला आहे. मे. दिनशॉ डेअरी कंपनीला आपल्या बँकेने दिनांक २०.१२.२००० ला पत्रान्वये रुपये २०.०० कोटीचे मुदती कर्ज प्लॅन्ट व मशिनरी करिता मंजुर केले आहे. व यामधूनच माशिनरीचे ॲडव्हान्स पेमेन्ट तसेच एल.सी. ओपन करायची आहे. आयात करावयाच्या मशिनरीची किंमत तसेच किंमतीचे ३०% ॲडव्हान्स रक्कम व ७०% एल.सी. द्वारे अदा करावयाची रक्कम खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | मशिनरी पुरवठा करणाऱ्या कंपनीचे नांव | कोटेशननुसार माशिनरीची किंमत. | ३०% ॲडव्हान्स रक्कम | ७०% एल.सी. ची रक्कम. |
|---|---|---|---|---|
| १. | टेट्रापॅक हॉयर, डेनमार्क | डि.के. ९९३४५०<br>रूपये ५६५३००० | डि.के. २९८०३५<br>रूपये १६९५९०० | डि.के. ६९५४१५<br>रूपये ३९५७१०० |
| २. | ——— " ——— | डि.के. १०११७६५०<br>रूपये ५७६७९००० | डि.के. ३०३५२९५<br>रूपये १७३०३७०० | डि.के. ७०८२३५५<br>रूपये ४०३७५३०० |
| ३. | सिडाम एस.आर.एल. | युरो २७५००<br>रूपये ११६०००० | युरो ८२५०<br>रूपये ३४८००० | युरो १९२५०<br>रूपये ८१२००० |
| | एकूण | रूपये ६४४९२००० | रूपये १९३४७६०० | रूपये ४५१४४४०० |

वरील प्रमाणे सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता आवश्यक ती सर्व कागदपत्रे बँकेकडे सादर केली आहेत. मे. दिनशॉ डेअरी फुडस प्रा. लि. या कंपनीला बुटीबोरी येथे आईसक्रीम निर्मीतीचे नविन प्लॅंटकरिता रुपये २०.०० कोटी मुदती कर्ज बँकेने मंजूर केले आहे. त्यांत प्लॅन्ट व मशिनरी करिता रु. ११.४० कोटी पर्यंत कर्ज उपलब्ध करुन द्यावयाचे आहे. कंपनीने वरील प्रमाणे विदेशातून मागविलेल्या माशिनरीचे तिन ऑर्डरची भारतीय चलनातील एकुण किंमत रु. ६,४४,९२,०००/- असून त्यापैकी ३०% रक्कम रु. १,९३,४७,६००/- कंपनीला ॲडव्हान्सपोटी जमा करावयाची असून उर्वरित ७०% रक्कम रु. ४,५१,४४,४००/- एल.सी. द्वारे उपलब्ध करुन द्यावयाची आहे.

ॲडव्हान्स पोटी अदा करावयाचे रकमेपैकी 33% रक्कम रुपये ६३,८८,९००/- कंपनीने शाखा झिंगाबाई टाकळी येथिल चालु ठेव खात्यांत जमा केलेली असून, उर्वरित ६७% रक्कम रु.१,२९,६३,३००/- ही त्यांचे कर्ज खात्याला नांवे टाकावयाची आहे. व याप्रमाणे संपूर्ण ॲडव्हान्सची रक्कम महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या, मुंबई येथील आपले बँकेचे चालु ठेव खात्यातून राज्य बँकेला आपले बँकेचे चालु ठेव खात्यातून राज्य बँकेला उपलब्ध करुन द्यावयाची आहे. तसेच मशिनरी किंमतीची उर्वरित ७०% रक्कम रुपये ४,६५,४५,८००/- एल० सी० द्वारे उपलब्ध करुन देण्याकरिता या रकमेच्या ११०% रक्कम महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई येथिल आपल्या चालु ठेव खात्यातून अदा करण्याकरिता सदरची रक्कम "इअरमार्क" करण्याकरिता राज्य बँकेला हमी द्यावयाची आहे. तसेच मशिनरी पुरवठा करणाऱ्या कंपनीचा स्टेटस् रिपोर्ट व इतर कार्यवाही करिता आवश्यक असलेली रक्कम आपल्या मुंबई येथिल चालू ठेव खात्यातून अदा करण्यास राज्य बँकेला संमती द्यावयाची आहे. सदरच्या मशिनरी खरेदीपोटी ॲडव्हान्स पेमेन्ट एल० सी० अंतर्गत होणारे व इतर सर्व खर्चाचे व कमीशन चार्जेसचे आपल्या बँकेस नांवे होणारे संपूर्ण सदर कंपनीच्या कर्ज खात्याला वेळोवेळी नांवे टाकण्यांत येईल.

वरील सर्व बाबी विचारांत घेता मे. दिनशॉ डेअरी फुडस् प्रा० लि. नागपूर यांना वरीलप्रमाणे मशिनरी खरेदी करिता आवश्यक असलेली रक्कम रुपये ६,६४,९४,०००/- पैकी 30% ॲडव्हान्स रक्कम रुपये १९९४८२००/- व उर्वरित ७०% रक्कम रुपये ४,६५,४५८००/- एल० सी० द्वारे उपलब्ध करुन देणे बाबत महा० राज्य सह० बँकेला आवश्यक असणारे ठराव पाठविणे आवश्यक आहे.

बँकेच्या मा० संचालक मंडळाची सभा तत्काळ बोलाविणे शक्य नसल्याने दिनशॉ कंपनीची तातडीची गरज लक्षांत घेता खालील प्रमाणे सर्क्युलर ठराव करण्यांत आला आहे.

Resolved that :-

1) At the request of M/S. Dinshwa's Dairy foods Pvt. Ltd; Nagpur a joint and several guarantee be issued in favour of the Maharashtra State Coop. Bank Ltd; Mumbai against the documentary credit to be issued by the letter for the rupees equivalent of DKK 77,77,770 (In Words Seventy seven lakhs seventy seven thousand seven hundred seventy DKK) and 19250 EURO (In Words Nineteen thousand two hundred

fifty EURO) at the rate of exchange applicable for retirement of bills thereunder.

2. The Maharashtra state Cooperative Bank ltd, Mumbai is authorised to debit current account No. 96/5751 with themselves by Rupee equivalent of the bill amount, charges and interest if any incurred under the documentary credit.

3. Any two of the following persons are authorised to sign guarantee, counter guarantee, status report on applicant and instructions for issue of the documentary credit.

| SrNo. | Name | Designation. |
|---|---|---|
| 1. | Shri S.C. Kedar | Chairman |
| 2 | Smt. A.C. Mahajan | Vice-chairman. |
| 3. | Shri R.V. Nimje | Director |
| 4. | Shri A.N. Chaudhary | General Manager. |
| 5. | Shri S. S. Gode | Manager (officiating) |

4. Any one of the following persons is authorised to counter sign documents issued by the applicant for the credit.

| SrNo. | Name | Designation |
|---|---|---|
| 1. | Shri A.N. Chaudhary | General Manager. |
| 2 | Shri S.S. Gode | Manager (officiating) |

Seen

वरील प्रमाणे करण्यांत आलेला दिनांक २२.१२.२००० रोजीचा सर्क्युलर ठराव सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ८ – बँकेच्या वैयक्तिक सभासदांचे मृत्युनंतर वा हयात असतांना शेअर्स तबदील करून झालेल्या वैयक्तिक सभासदांचे माहितीबाबत.

ठराव क्रमांक ८ – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर चर्चा होऊन बँकेच्या वैयक्तिक सभासदांचे मृत्युनंतर वा हयात असतांना शेअर्स तबदील करून झालेल्या वैयक्तिक सभासदांचे माहितीबाबतचा विषय पुढील सभेत ठेवण्यांत यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ५ - श्री गणेश उपसा जलसिंचन योजना मर्या. दिघोरी ता. कामठी न राबविण्याबाबत राज्य/राष्ट्रीय बँकेस ठरावासह कळविणे बाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ५ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, सन आक्टोंबर १९९६ मध्ये श्री गणेश उपसा जल सिंचन योजना मर्या दिघोरी ता. कामठी या संस्थेला कर्ज मागणी प्रस्तावाप्रमाणे रुपये ५२.०० लाख रक्कम मंजूर करण्यांत आलि होती. या प्रकल्पाअंतर्गत ५० लाभार्थीना नागनदीवरुन सिंचन उपलब्ध होणार होते. त्या अनुषंगाने लाभार्थीकडून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करुन घेण्यांत आली. बँकेच्या कर्ज धोरणानुसार एकूण प्रकल्प खर्चाच्या २०% दराने स्वगुंतवणूक करणे अपेक्षित होते. परंतु लाभार्थीनी २०% दराने स्वनिधीतून स्वगुंतवणूक केली नाही व त्यानुसार स्वगुंतवणूक करण्यास त्यांची तयारी नाही तसेच संस्थेचे कामकाजांत कोणतेच प्रगती नाहि सदर प्रकल्पाअंतर्गत तांत्रिक बाबींचे पुर्ततेसाठी तांत्रिक सल्लागार नाहित. बँकेची वसुली ६०% पेक्षा कमी असल्याने सदर प्रकल्प नाबार्ड मंजुरीकरिता स्विकारणार नाहि व फेरकर्ज देणार नाहि. वरील बाबी विचारांत घेता तसेच महा. राज्य सह. बँकेने मागणी केल्याप्रमाणे सदर योजना न राबविण्याबाबत ठरावासह महा. राज्य सहकारी बँकेस कळवावे लागेल.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन श्री गणेश उपसा जलसिंचन योजना म. दिघोरी ता. कामठी या संस्थेची प्रलंबीत असलेली उपसा जलसिंचन योजना लाभार्थीची अनुत्सुकता विचारांत घेता योजना न राबविण्याबाबत महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेस कळविण्यांत यावे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ६ - श्री. ए. एन. चौधरी सरव्यवस्थापक यांच्या परसेवा कालावधी संपल्याने त्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ६ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेतील मुख्याधिकारी श्रेणीतील अधिकारी श्री. ए. एन. चौधरी हे दिनांक २६.८.१९९३ पासून परसेवेवर सरव्यवस्थापक म्हणून आपल्या बँकेत

काम करीत आहेत. त्यांचे परसेवेच्या कालावधी दिनांक २५.१.२००१ रोजी संपला आहे.

श्री. ए.अेन.चौधरी यांना मागील ७½ वर्षापासून सरव्यवस्थापक पदाच्या पदभार यशस्वीरित्या सांभाळलेला आहे. या काळांत त्यांनी बँकेची प्रगती साधण्यास मोलाचे सहकार्य केले आहे. आजची बँकेतील परिस्थिती विचारांत घेता त्यांच्या सेवेची बँकेला गरज आहे. त्यामुळे श्री ए.अेन.चौधरी यांचे परसेवेचा कालावधी आणखी एक वर्षाने म्हणजे दिनांक २५.१.२००२ पर्यंत वाढविण्यांत यावा. अशी विनंती महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमि; मुंबई यांना करण्यांत यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ८ — मे. विदर्भ कोल्ड स्टोअरेज कळमना मार्केट यार्ड, नागपूरचे कोल्ड स्टोअरेज उभारणीसाठी आलेल्या प्रकल्प अहवालानुसार मुदती कर्ज रूपये १४०.०० लाखाचे कर्ज मागणी अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ८ — मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, मे. विदर्भ कोल्ड स्टोअरेज, कळमना बाजार ही भागीदारी फर्म कृषि उत्पन्न बाजार समिती कळमना मार्केट यार्डमध्ये ४०००टन क्षमतेचा नविन कोल्ड स्टोअरेज उभारणी करीत आहे. सदर कोल्ड स्टोअरेजने लिजवर घेतलेल्या — १०७२.२५८ चौरस मीटर जागेवर स्वनिधीतून ४०% ते ५०% बांधकाम केले आहे. उर्वरित बांधकामाकरिता, प्लँट व मशिनरीकरिता भांडवली खर्च रूपये १४०.०० लाख मुदती कर्जाची मागणी बँकेकडे केली आहे. फर्मने महाराष्ट्र शासनाचे उद्योग संचालनालय यांचेकडे नोंदणी साठी अर्ज केला असून जिल्हा उद्योग केंद्र नागपूर यांचेकडून अस्थाई नोंदणी क्रमांक प्राप्त केला आहे. महाराष्ट्र पोल्युशन कंट्रोल बोर्ड, नागपूर ची परवानगी प्राप्त केली आहे. फर्मने यासाठी सादर केलेली आर्थिक पत्रके व प्रकल्प अहवाल बँकेचे पॅनेलवरील चार्टर्ड अकांउंटंट यांनी छाननी केली असून प्रकल्प अहवाल आर्थिक व तांत्रिक दृष्ट्या सक्षम असल्याचा अभिप्राय देऊन प्रकल्पानुसार आवश्यक भांडवली खर्चाचे ३०% मार्जीन राखून ७०% मुदती कर्ज देण्यास शिफारस केली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन सुरुवातीच्या ६ महिने हा सवलतीचा काळ विचारांत घेऊन ८ वर्षाचे कालावधीकरिता द.सा.१५% दराने भांडवली कर्जाच्या ७०% प्रमाणे मुदती कर्ज रूपये १३८.०० लाख निधी उपलब्ध करून देण्यात यावा. कर्जाची परतफेड व्याजासह सहामाही हप्त्यांत असावी. तत्पूर्वी सदर प्रकल्प अहवाल महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेमार्फत नाबार्डला पाठवून

Seen

मंजुरी घेण्यांत यावी असे ठरले. प्रकल्प अहवालाप्रमाणे कर्जपुरवठा करण्यास नाबार्डने घातलेल्या अटी बँकेस मंजूर राहतील.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ८ - नाबार्ड कडून मंजूर असलेली दामदुप्पट गठन योजना मागिल वर्षीप्रमाणेच सन २००१-२००२ करिता राबविणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ८ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या सभासद असलेल्या सेवा सहकारी संस्थेच्या सभासदांकडे मुद्दलाएवढे व्याज झालेल्या किंबहुना जास्त व्याज झालेल्या सभासदांना सेवा सहकारी संस्था मार्फत कर्जपुरवठा मिळणे बंद झाल्यामुळे बँकेच्या नविन योजनांच्या व सवलतींचा लाभ त्यांना मिळू शकत नाही. अशा थकित सभासदांसाठी नाबार्डने दिलेल्या मंजूरीच्या आधारे मा० बोर्डाचे सभेत निर्णय होऊन दिनांक १ जून २००० पासून ही योजना राबविण्यांत आली. या योजनेअंतर्गत अनेक सभासदांनी लाभ घेतलेला आहे. यावर्षी सुद्धा मागिल वर्षी प्रमाणेच दामदुप्पट गठन योजना राबविण्याचा विचार व्हावा असे वाटते.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन नाबार्डनी सदर योजनेला दिलेल्या विशेष मंजूरी पत्रांत ही योजना विशिष्ट कालावधीसाठी राबवावी असे नमुद केले नसल्यामुळे मागिल वर्षीप्रमाणेच या वर्षी २००१-२००२ मध्ये दामदुप्पट गठन योजना राबविण्यांत यावी. त्याकरिता ज्या थकित सभासदांचे दिनांक ३१.३.२००१ अखेर व्याज मुद्दलाएवढे किंवा मुद्दला पेक्षा जास्त झाले आहे अशा लघु मुदती कर्ज घेणाऱ्या तसेच मध्यम मुदती ट्रॅक्टर व जीप वगळून कर्ज घेणाऱ्या सभासदांना या योजनेचा लाभ देण्यांत यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ९ - मा० अध्यक्ष यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषयावर चर्चा करणे.

विषय क्रमांक ९ (१) - मुदती ठेवींवर तिमाही व्याज आकारणी करणेबाबतचे मागणी अर्जावर विचार करणे.

ठराव क्रमांक ९ (१) - मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले

की, आपल्या बँकेत मुदती ठेवीवर व्याजाची आकारणी सध्याचे बँकेचे धोरणानुसार सहामाही करण्यांत येते. इतर बँकाप्रमाणे आपल्या बँकेने देखील मुदती ठेवीवर तिमाही व्याज आकारणी करुन त्यांचे सुचनेनुसार व्याज जमा करण्यांत यावे अशी ठेवीदारांची मागणी आहे. विषयावर सविस्तर चर्चा होऊन आपल्या बँकेने मुदती ठेवीवर तिमाही व्याज आकारणी करुन व्याज दिल्यास बँकेवर किती बोझा पडेल व उत्पन्नावर किती परिणाम होईल याबाबत माहिती घेउन हा विषय यानंतरचे सभेसमोर आणावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ६ (२) - प्रकल्पा अंतर्गत गेलेल्या जमिनीपोटी मिळालेल्या चेक्सवरील डिस्काऊंट कमीशन माफ करणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ६(२) - मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेला ठेवी मिळाव्या व आपली कर्जबाकी (कर्जदार असलेल्या सभासदांकडील) वसुल व्हावी या उद्देशाने उमरेड शाखेने गोसी प्रकल्पा अंतर्गत गेलेल्या शेतजमीनी पोटी मिळालेल्या चेक्सची रुपये ५८.८८ लाखाची वटवणुक चेक्स डिस्काऊंट करुन संबंधिताचे खात्याला रकमा जमा करण्यांत आल्यात. कांही खातेदारांनी आपल्या कडे मुदती ठेवी ठेवल्या आहेत. परंतु डिस्काऊंट केलेल्या चेक्सकरिता आकारण्यांत आलेले कमीशन माफ करण्यांत यावे अशी संबंधित खातेदारांनी मागणी केली आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन प्रकल्पांतर्गत गेलेल्या जमीनी पोटी मिळालेल्या चेक्सकरिता खालील अटी पूर्ण केल्यास यापुढेही डिस्काऊंट कमीशन आकारण्यांत येवू नये.

१. खातेदाराने/चेकधारकाने डिस्काऊंट केलेल्या चेक्सच्या रकमेच्या अर्धी रक्कम मुदती ठेवीत ठेवणे अनिवार्य राहील.

२. मुदती ठेवीचा कालावधी कमीत कमी १ वर्षाचा असावा.

३. चेक्सच्या रकमेच्या अर्ध्यापेक्षा अधिक रक्कम कमीत कमी १ वर्षाकरिता मुदती ठेवीत ठेवतील त्यांनाच डिस्काऊंट कमीशन माफ करावे.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ६ (३) - वैयक्तिक ओव्हरड्राफ्ट मर्यादा मंजूरीसाठी निकष ठरविणे.

ठराव क्रमांक ६ (३) - मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, वैयक्तिक ओव्हर ड्राफ्ट कर्ज मर्यादा योजने अंतर्गत कर्ज प्रकरणासाठी

ठरविण्यांत आलेला रु. २५.०० कोटींचा निधी संपुष्टांत आला असून दिनांक २१.१२.२००० रोजीची रुपये ४०.४८ कोटी कर्जबाकी विचारांत घेता सदर निधी अपुरा पडत आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन ओव्हर ड्राफ्ट कर्जमर्यादा योजने अंतर्गत सभासदांचे वाढता मागणीप्रमाणे ओव्हर ड्राफ्ट कर्ज प्रकरणासाठी रुपये ४५.०० कोटी वरून हा निधी रुपये १५.०० कोटीने वाढवून रु. ६०.०० कोटी करण्यांत यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ९(४) – प्राथमिक कृषि संस्था/खरेदी विक्री संघ यांना नाबार्डचे क्रेडिट योजने अंतर्गत कॅशक्रेडिट/नजर गहाण कर्जमर्यादा मंजुरीकरिता कर्ज धोरण ठरविणेबाबत.

ठराव क्रमांक ९(४) – मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, शेतकऱ्यांना उत्पादित शेतमाल साठवणुकीसाठी योग्य अशी व्यवस्था नसल्याने किंवा पैशाची नितांत गरज असल्याने आपला शेतमाल मार्केटला त्वरित नेऊन मिळेल त्या भावांत विकावा लागतो. ही बाब विचारांत घेता ज्या प्राथमिक कृषि संस्थांकडे/खरेदी विक्री संस्थांकडे स्वमालकीची पक्की गोदामे आहेत त्या ठिकाणी शेतकऱ्यांच्या उत्पादित शेतमालाची अल्पदराने भाडे आकारून साठवणूक केल्यास आणि शेतकऱ्यास पैशाची आवश्यकता असल्यास साठवणूक केलेल्या शेतमालापोटी कर्जाची सुविधा उपलब्ध करून दिल्यास शेतकऱ्यांची पैशाची गरज भागेल व उत्पादित शेतमाल योग्य भाव येईपर्यंत साठवून ठेवता येईल. यामुळे संस्थेचे उत्पन्न वाढेल, शेतकऱ्यांना योग्य भावाने शेतमाल विक्री करून अधिक रक्कम प्राप्त होईल व कर्जाची परतफेड करता येऊ शकल्यामुळे पुढील कर्ज व सवलतीपासून वंचित राहणार नाही. जिल्हा सहकारी बँकांनी ही योजना राबविण्यासाठी नाबार्डचे मार्केटिंग क्रेडिट योजने अंतर्गत जिल्ह्यातील प्राथमिक कृषि सहकारी संस्था व खरेदी विक्री सह. संस्थांनी कर्ज उपलब्ध करून देणेबाबत मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांनी दिनांक १८.७.२००० व २.८.२००० चे पत्रानुसार कळविले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन ज्या प्राथमिक कृषि पत संस्था/खरेदी विक्री सह. संस्थांकडे सुस्थितीतील पक्क्या गोदामांची व्यवस्था आहे अशा संस्थांनी शेतकऱ्यांच्या उत्पादीत शेतमाल तारणांत घेऊन त्यांना कर्जपुरवठा

केल्यास अशा पात्र संस्थांना नाबार्डचे मार्केटींग क्रेडिट योजने अंतर्गत बँकेमार्फत कॅश क्रेडिट/मजूर ग्रहण कर्ज मर्यादा उपलब्ध करून देणेकरिता खालीलप्रमाणे कर्ज पुरवठयाच्या अटी व शर्तीबाबतचे धोरण असावे असे ठरले.

कर्ज धोरण

१. संस्थेत मालाची साठवणूक करणारा शेतकरी हा सेवा/विविध कार्यकारी संस्थेचा सभासद असावा.

२. या योजनेअंतर्गत कर्ज मागणी करणाऱ्या संस्थेकडे सुरक्षिततेच्या गोदामाची व्यवस्था असणे आवश्यक आहे. तसेच त्या ठिकाणी पूर्ण वेळ काम करणारा कर्मचारी वर्ग असणे आवश्यक आहे.

३. संस्थेची या कर्जासह एकूण कर्ज मागणी ही बँकेकडील नक्त विनियोगक्षम भांडवलाचे प्रमाणांत येणाऱ्या कर्जमर्यादेच्या आंत असावी.

४. शेतकऱ्यांचा शेतमाल ताब्यात घेतल्यापासून त्याची विक्री करून रक्कम शेतकऱ्यांना उपलब्ध करून देईपर्यंत अथवा विक्रीकरिता माल शेतकऱ्यांचे ताब्यात देईपर्यंत मालाचे सुरक्षिततेची संपूर्ण जबाबदारी संबंधित संस्थेची राहील.

५. ताब्यांत घेतलेल्या मालाची मोजमाप करून माल ताब्यात घेण्याबाबतची गोदाम पावती (मालाचे बाजार मुल्यानुसार एकूण मुल्य दर्शवून) संस्थेने शेतकऱ्यांना देणे आवश्यक राहील.

६. ताब्यात घेतलेल्या मालाचे एकूण मुल्याचे ६०% पर्यंत रक्कम माल ताब्यांत घेतेवेळी शेतकऱ्याला त्याचे मागणी अर्जानुसार चेकद्वारे उपलब्ध करून द्यावी लागेल.

७. शेतकऱ्याने चेक वटविताना ताब्यात दिलेल्या मालाचे पावतीची झेरॉक्स प्रत शाखेत सादर करावी लागेल. ती झेरॉक्स प्रत संस्थेने प्रमाणित केलेली असावी.

८. गोडाऊन मधील साठवणूक केलेल्या मालाचे विक्रीपोटी आलेल्या रकमेतून सभासदाला दिलेल्या कर्जाची व त्यावरील अद्यावत व्याजाची रक्कम प्रथमत: कपात करून बँकेतील कर्ज खात्यांत संस्थेला जमा करावी लागेल. या कार्यवाहीची लेखी हमी संस्थेला कर्ज उपलब्ध करून घेतेवेळी द्यावी लागेल.

९. संस्थेला गोडाऊनमध्ये ठेवलेल्या मालाचे भाडे म्हणून शेतकऱ्यांकडून प्रतिमहा प्रति बॅग रुपये २/- प्रमाणे आकारणी करण्यांत येईल.

१०. संस्थेला गोडाऊन व त्यामधील मालाचा बँक व संस्थेच्या नांवाने संयुक्त विमा काढून पॉलीसी शाखेला सादर करावी लागेल.

११. सदरचा कर्जपुरवठा हा हंगामी स्वरुपाचा असल्यामुळे शेतमाल मार्केट मध्ये विक्री करण्याकरिता येणाऱ्या हंगामातच उपलब्ध करून देता येईल. तसेच या कर्जाची परतफेड ९० दिवसाचे आंत करावी लागेल. त्यानंतर दंडनीय व्याजाची आकारणी करण्यांत येईल.

१२. शेतकऱ्याने ३० दिवसाचे आंत काढून न नेल्यास त्या मालाची विक्री करून कर्जाची रक्कम वसुल करून देण्याची जबाबदारी संस्थेची राहिल.

१३. सदर कर्जाकरिता जिल्हा बँक ते संस्था स्तरावर व्याजाचा द.सा. १२% राहिल. संस्था सुध्दा याच दराने शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देईल. मुदतीचे आंत कर्जाची परतफेड न झाल्यास दोन्ही स्तरावर १४ टक्का दंडनिय व्याज आकारण्यांत येईल.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ९(५) – बँकेच्या अद्यावत कर्ज वसुलीचा आढावा घेणे.

ठराव क्रमांक ९(५) – मा. अध्यक्ष यांनी बँकेचे अद्यावत वसुलीबाबत सभेला माहिती देतांना सांगितले की, सन २०००-०१ मधील बँक कर्जाची वसुली मा. संचालक मंडळाने मंजूर केलेल्या कृती कार्यक्रमाप्रमाणे करण्यांत येत आहे. सन २०००-०१ या पिक हंगामात अपूऱ्या व अकाली पाउसामुळे जिल्ह्यातील धान, ज्वार, कापूस, सोयाबीन, मिरची ह्या पिकांची परिस्थिती फारशी समाधानकारक नसतानांही कर्जवसुलीसाठी जास्तीत जास्त पाठपुरावा करून प्रयत्न सुरु आहेत. थकबाकीदारांचे कर्जावरील वाहने जप्तीची मोहीम राबवून तसेच वसुली रॅली सभा नोव्हेंबर २००० व जानेवारी २००१ मध्ये आयोजीत करून कर्ज वसुलीकरिता पोषक वातावरण तयार करण्यांत आले आहे. मागील जानेवारी २००० अखेरील ६.२२% कर्ज वसुलीपेक्षा यावर्षी जानेवारी २००१ अखेरील कर्जवसुली १२.५४% झाली आहे. या वर्षी कर्जवसुली मागील वर्षीपेक्षा जास्त झाली आहे. तरीपण कर्ज वसुलीच्या हंगामवार शिस्तीचे पालन करणेकरिता जोमाने प्रयत्न करून पाठपुरावा करण्याची आवश्यकता आहे. यावर्षी १५५६ खरीप गावापैकी ११२५ गावातील ५० पैसे खाली आणेवारी जाहिर झाली असून चालू शेती कर्जाचे रुपांतर करणेबाबत सुचना प्राप्त झाल्या आहेत.

विषयावर सविस्तर चर्चा होउन बँकेच्या २०००-०१ मधील अद्यावत कर्जवसुलीचा आढावा घेण्यांत आला व याबाबत सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ९(६) – राष्ट्रीयकृत व इतर बँकांकडून प्राप्त होणाऱ्या सशर्त ना हरकत प्रमाणपत्रासंबंधी द्यावयाच्या निर्णयाबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ९ (६) — मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेतर्फे संस्थामार्फत किंवा वैयक्तिक सभासदांना कर्ज मंजूर करतांना अर्जदार ज्या ठिकाणी राहत असेल किंवा त्यांचा व्यवसाय जेथे असेल त्या परिसरातील व्यापारी व अन्य वित्तीय संस्थांकडून त्यांचे कर्ज नसल्याबाबतचे प्रमाणपत्र मागविण्यांत येते. व्यापारी किंवा अन्य वित्तीय संस्थांकडून प्राप्त झालेल्या प्रमाणपत्रावरील मुळ अर्जदारावर कर्ज नाही परंतु कुंटुंबातील इतर व्यक्तीकडे थकित किंवा चालु कर्ज असल्याच्या शेऱ्यामुळे कर्ज मंजुरीच्या विचार करतांना संभ्रम निर्माण होतो. व अशा प्रकरणांत अर्जदार सभासद कर्जापासून वंचीत होतो. कर्ज मागणी करणाऱ्या अर्जदारास त्रास होउ नये व तो कर्जापासून वंचीत होउ नये म्हणून सोबतचे टिपणीत सुचविलेल्या उपाययोजना अमलांत आणाव्या असे वाटते.

विषयावर सविस्तर चर्चा होउन जिल्हा बँकेकडे कर्ज मागणी करणाऱ्या सेवा संस्थेचे सभासदाला / वैयक्तिक सभासदाला तो राहत असलेल्या परिसरातील अथवा त्यांच्या व्यवसाय असलेल्या परिसरातील व्यापारी बँका, इतर वित्तीय संस्था कडून अर्जदाराचे नांवाने कर्ज नसल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवितांना त्रास होउ नये, कर्ज व सवलती पासून वंचित होउ नये म्हणून खालील प्रमाणे उपाययोजना अमलांत आणाव्या असे ठरले.

<u>उपाययोजना</u>

१. अर्जदाराचे कर्ज नसल्याचे प्रमाणपत्रावर जर त्यांचे कुंटुंबातील वडिलांच्या, मुलाच्या, भावाच्या, पत्नीच्या व आईच्या कर्जाचा उल्लेख असल्यास संबंधीत बँकेमध्ये अर्जदार गहाणांत देत असलेली स्थायी संपत्ती गहाण आहे काय? तसेच अर्जदार संबंधीत कुंटुंबातील व्यक्तीच्या कर्जाकरिता जामिन आहे काय? तसेच अर्जदाराची इतर काही संपत्ती त्यांचे कर्जाकरिता गहाणांत / नजर गहाणांत बँकेकडे आहे काय? याबाबतची चौकशी करुन संस्थेनी व निरिक्षकांनी आपला अहवाल कर्ज प्रकरणासोबत सादर करावा.

२. त्याचप्रमाणे अर्जदार गहाणांत देत असलेली शेती, घर, किंवा अन्य स्थायी संपत्तीवर संबंधीत व्यापारी बँकेचा बोझा नोंद आहे काय? याबाबत खात्री करुन व कागदपत्रांची छाननी करुन निरिक्षकांनी अहवाल द्यावा.

३. वरील बाबीची खात्री करण्यास किंवा माहिती घेण्यास अडथळा निर्माण होत असेल तर व्यापारी बँकेनी प्रमाणपत्रावर नमुद केलेल्या कर्ज रकमेएवढी रक्कम बँकेत कर्ज मुदतीपर्यंत मुदती ठेवीत ठेवून त्यावर कर्ज बोझा नोंद करुन घ्यावी.

४. व्यापारी बँकेने प्रमाणपत्रावर कुंटुंबाव्यतिरिक्त इतर

व्यक्तींच्या कर्जाची नोंद असल्यास असे प्रमाणपत्र ग्राह्य न मानता अर्जदार सभासदास क्लिअर स्वरूपाचे प्रमाणपत्र मागविण्यांत यावे.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ९ (७) - हरीत गृह उभारणी प्रकल्पाअंतर्गत कर्ज मंजुरीबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ९ (७) - मा॰ अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, पारंपारीक शेती व्यवसायांत दिवसेंदिवस सुधारणा व यांत्रिकीकरण होत असून कमी जागेत हरीत गृहाची उभारणी करून फुलांची, फळांची वनौषधींची शेती करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढत आहे. ही बाब विचारांत घेऊन बँकेनी हरीत गृह उभारणीसाठी कर्ज योजना तयार केली आहे. हरितगृह उभारणीकरिता महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ पुणे व नॅशनल हार्टीकल्चर बोर्ड यांचेकडून तीन कर्ज प्रकरणे प्राप्त झाली असून त्यांचेकडून प्रकल्पाअंतर्गत कांही प्रमाणांत शासकीय अनुदान सुध्दा प्राप्त होणार आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन हरितगृह प्रकल्पा अंतर्गत गुंतवणुक आर्थिक दृष्ट्या किफायतशिर असल्याने हरितगृह उभारणीसाठी प्राप्त झालेल्या कर्ज प्रकरणांतील खालील सभासदांना सेवा सहकारी संस्थांचे मार्फत कर्जवाटपासाठी प्रत्येकी रुपये ३५०२५०.०० कर्ज मर्यादा मंजूर करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव | संस्थेचे नांव | शाखा | कर्ज मर्यादा |
|---|---|---|---|---|
| १. | श्रीमती आशाताई मारोतराव शेंडे | मोहपा | मोहपा | रु. ३५०,२५०.०० |
| २. | श्री देवीदास गुलाबराव ठाकरे | बनवाडी | गणेशपेठ | रु.३५०,२५०.०० |
| ३. | श्री ओम जाजोदीया | वाकेश्वर | बुटीबोरी | रु. ३५०२५०.०० |

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ९ (८) - झिंगाबाई टाकळी शाखेची कार्यालयीन वेळ बदलण्याबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ९ (८) - मा॰ अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेची झिंगाबाई टाकळी येथील दिनांक ५.८.२००० रोजी उघडण्यांत आलेली शाखा दोन शिफ्टमध्ये सुरु आहे. बँकेचे ठेवीदार

व ग्राहकांना बँकींग सेवेचा अधिकाधिक फायदा मिळावा म्हणून तसेच शाखेच्या ठेवीत व कर्ज व्यवहारांत वाढ व्हावी या उद्देशाने ही शाखा रविवारी सुरु ठेवण्या बाबत विचार व्हावा असे वाटते.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन दोन शिफ्टमध्ये सुरु असलेली झिंगाबाई टाकळी ही शाखा रविवारी सुरु ठेवण्यांत यावी व आठवडी सुटी बुध वारी ठेवण्यांत यावी. याकरिता झिंगाबाई टाकळी शाखेच्या कार्यालयाच्या वेळा दिनांक १५.४.२००१ पासून खालीलप्रमाणे ठेवण्यांत याव्या असे ठरले.

| अ.क्र. | दिवस (वार) | कार्यालयाची वेळ | ग्राहकासाठी कामकाजाची वेळ. |
|---|---|---|---|
| १. | रविवार ते मंगळवार व गुरुवार ते शुक्रवार | सकाळी ९.३० ते १२.३० व दुपारी २.०० ते ६.०० | सकाळी ९.३० ते १२.३० व दुपारी २.०० ते ५.०० |
| २. | शनिवार ---- | सकाळी ९.३० ते २.०० | सकाळी ९.३० ते १.०० |
| ३. | बुधवार ---- | -- आठवडी सुटीचा दिवस | |

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ९(९) - हनुमाननगर, रामनगर शाखेच्या कामकाजाच्या वेळेतील बदल बाबत तसेच महाल व कळमना बाजार शाखेच्या वेळेबाबत...

ठराव क्रमांक ९(९) - मा० अध्यक्ष यांनी हनुमाननगर, रामनगर शाखेच्या ग्राहकां साठी कामकाजाच्या वेळेत दिनांक १०.८.२०००पासून करण्यांत आलेल्या बदलाबाबत माहिती दिली. महाल शाखेचे संगणीकरण होत असल्याने महाल शाखेच्या, तसेच कळमना बाजार या शाखांच्या ग्राहकांसाठी कामकाजा च्या वेळा वाढविण्याबाबत विचार व्हावा असे वाटते.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन हनुमाननगर व रामनगर शाखेच्या ग्राहकांसाठी खालीलप्रमाणे वाढविण्यांत आलेल्या कामकाजाच्या वेळेला मान्यता देण्यांत आली. महाल शाखेचे संगणीकरण पूर्ण व्हायचे असल्याने आहे त्याच वेळांमध्ये शाखा सुरु ठेवण्यांत यावी आणि कळमना बाजार शाखेच्या ग्राहकांसाठी कामकाजाच्या वेळा खाली दर्शविल्याप्रमाणे वाढविण्यांत याव्या असे ठरले.

| अ.क्र. | शाखेचे नांव | दिवस (वार) | ग्राहकासाठी कामकाजाच्या पूर्वीच्या वेळा. | बदल केल्यानंतर ग्राहकांसाठी कामकाजाची वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | हनुमाननगर | सोमवार ते शुक्रवार | सकाळी ९.०० ते १.०० | सकाळी ९.०० ते २.३० |
| | | शनिवार | सकाळी ९.०० ते ११.०० | सकाळी ९.०० ते १२.०० |
| २. | रामनगर | सोमवार ते शुक्रवार | सकाळी ९.३० ते १.३० | सकाळी ९.३० ते ३.०० |
| | | शनिवार | सकाळी ९.३० ते ११.३० | सकाळी ९.३० ते १२.३० |
| ३. | महाल | सोमवार ते शुक्रवार | सकाळी १०.३० ते २.३० | सकाळी १०.३० ते २.३० |
| | | शनिवार | सकाळी १०.३० ते १२.३० | सकाळी १०.३० ते १२.३० |
| ४. | कळमना बाजार | सोमवार ते शुक्रवार | सकाळी १०.३० ते २.३० | सकाळी १०.३० ते ३.३० |
| | | शनिवार | सकाळी १०.३० ते १२.३० | सकाळी १०.३० ते १.३० |

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक ६(१०) – गुजरांत राज्यातील भुकंपग्रस्तांना आर्थिक सहाय्य करणे बाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ६(१०) – मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, दिनांक २६.१.२००१ रोजी गुजरांत राज्यांत झालेल्या महाभयंकर प्रलयकारी भुकंपात फार मोठ्या प्रमाणावर वित्तहानी झाली असुन लाखाच्या जवळपास लोक मृत्युमुखी पडले आहेत. आपादग्रस्तांना योग्य ती मदतीचा हात देणे हे तुम्हा-आम्हा सर्वांचेच कर्तव्य आहे.

विषयावर चर्चा करतांना मा० अध्यक्ष यांनी कर्मचाऱ्यांनी एक दिवसाच्या पगाराएवढी रक्कम द्यावी व मॅचींग रक्कम बँकेचा घेवुन भुकंपग्रस्तांचे मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीस (गुजरांत) पाठविणे बाबतची सुचना मांडली. मा० अध्यक्ष यांनी मांडलेल्या सुचनेला उपस्थित सर्व संचालकांनी, प्रतिनिधींनी आपली स्विकृती दर्शविली.

विषयावर सविस्तर चर्चा होवुन गुजरांत राज्यातील भुकंपग्रस्तांचे मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीस (गुजरांत) कर्मचाऱ्यांचे एक दिवसाच्या पगाराएवढी (मुळ पगार + महागाई भत्ता मिळून) रक्कम देण्यात यावी. व मॅचींग रक्कम बँकेने द्यावी. व गोळा झालेली रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधीस (गुजरांत) पाठविण्यात यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ६(११) – बँकेच्या नविन शाखा उघडणेबाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ६(११) – मा. अध्यक्ष यांचे परवानगीने येणारे विषयावर चर्चा करतांना श्री आ.र.देशमुख म्हणाले की, नरखेड तालुक्यातील भिष्णूर या गावी त्या परिसरांतील लोकांचे बँकींगकरिता सोयीचे दृष्टीने बँकेची नविन शाखा उघडण्यात यावी. यानंतर श्री.व.भा.वांढे म्हणाले की, पारशिवनी तालुक्यातील तामसवाडी, साटक, नयाकुंड या ठिकाणी तेथील लोकांच्या सोयीचे दृष्टीने नविन शाखा उघडण्याकरिता आवश्यक कागदपत्रासह सहकार खात्याकडे मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्यांत यावा. तसेच दहेगांव जोशी, तालुका पारशिवनी व स्वावलंबीनगर नागपूर शहर या दोन ठिकाणी दिनांक २६.८.१९९९ नुसार मिळालेल्या परवानगीप्रमाणे नविन शाखा न उघडल्याने दहेगांव जोशी ऐवजी निंबा तालुका पारशिवनी येथे व स्वावलंबीनगर नागपूर शहर या ठिकाणी नविन शाखा उघडणेसाठी पूर्नपरवानगी मिळणेकरिता प्रस्ताव पाठविण्यांत यावा.

विषयावर सविस्तर चर्चा होउन कामाचे विकेंद्रीकरण व बँकींग सेवा उपलब्ध करुन देण्याचे दृष्टीने खालील ठिकाणी नविन शाखा उघडणेसाठी आवश्यक कागदपत्रासह सहकार खात्याकडे परवानगी मिळणेस्तव प्रस्ताव सादर करण्यांत यावा.

१. तामसवाडी — तालुका पारशिवनी
२. साटक — ,,
३. नयाकुंड — ,,
४. भिष्णूर — तालुका नरखेड

दिनांक २६.८.१९९९ चे पत्रानुसार सहकार खात्याकडून मिळालेल्या परवानगीप्रमाणे पत्रांतील अटीनुसार सहा महिन्याचे आंत दहेगांव जोशी तालुका पारशिवनी व स्वावलंबीनगर, नागपूर शहर या ठिकाणी नविन शाखा उघडण्यांत न आल्याने दहेगांव जोशी, तालुका पारशिवनी ऐवजी किंवा तालुका पारशिवनी व स्वावलंबीनगर, नागपूर शहर या नविन शाखा उघडणेसाठी सहकार खात्याकडे पुनर्परवानगी मिळणेकरिता विनंती करण्यांत यावी असेही ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ६ (१२). एकाधिकार कापूस खरेदी योजना २०००-२००१ हंगामातील कापूस खरेदीसाठी करावयाच्या कर्ज पुरवठ्यातील जिल्हा बँकाच्या सहभागाबाबत

ठराव क्रमांक ६ (१२) - मा. अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, एकाधिकार कापूस खरेदी योजना २०००-२००१ हंगामातील कापूस खरेदीसाठी कापूस उत्पादक पणन महासंघाने महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे कर्ज मागणी केल्यानुसार दिनांक १६.११.२००० रोजीचे मा. व्यवस्थापक समितीचे सभेत झालेल्या निर्णयाप्रमाणे कापूस सहभाग योजनेअंतर्गत रुपये ५०.०० कोटी गुंतवणुक करण्यांत आलेली आहे. कापूस सहभाग योजनेअंतर्गत आपल्या बँकेने पुनश्च गुंतवणुक करणेसाठी आलेल्या मागणीप्रमाणे बँकेकडे असलेला निधी विचारांत घेता रुपये ३०.०० कोटी सहभाग वाढवून कापूस सहभाग योजनेअंतर्गत रुपये ८०.०० कोटीपर्यंत गुंतवणुक करावी असे वाटते.

विषयावर सविस्तर चर्चा होउन कापूस सहभाग योजनेअंतर्गत पुनश्च रुपये ३०.०० कोटी गुंतवणुक करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि कंसाराशियम लिडर बँक म्हणून राज्य सहकारी बँक यांच्यात करावयाच्या करारातील अटीस मान्यता देण्यांत येत आहे. या योजने अंतर्गत वेळोवेळी चर्चा करुन निर्णय घेणे, दस्तऐवजावर सह्या करणे याकरिता

बँकेचे सरव्यवस्थापक, त्यांचे अनुपस्थितीत बँकेचे प्रभारी व्यवस्थापक यांना अधिकार देण्यात येत आहेत.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ६ (९३) - महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या. यांना फेर कर्जाची मर्यादा वाढवून मागण्याबाबत.

ठराव क्रमांक ६ (९३) - मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेनी बँकींग प्लॅन २०००-२००१ अंतर्गत घ्यावयाच्या फेर कर्जाची मर्यादा रुपये ७८.०० लाख फक्त मंजूर केली आहे. बँकेला लघु सिंचन, कृषि यांत्रिकी, व इतर कर्जाची फेरउचल करायची असल्यामुळे ही मर्यादा कमी पडत आहे त्यामुळे लघु सिंचनाकरिता रुपये ६५.०० लाख व कृषि यांत्रिकी व शेती अवजाराकरिता रुपये ४५०.०० लाख, दुभती जनावरे व इतर कारणाकरिता रुपये २०.०० लाख अशी एकूण रुपये ५३५.०० लाख फेर कर्जाची मर्यादा महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून मंजूरी घेण्यात यावी.

विषयावर सविस्तर चर्चा होऊन बँकेला लघुसिंचन, कृषियांत्रीकी शेती अवजारे, दुभती जनावरे व इतर कारणाकरिता फेर कर्ज उचल करायचे असल्याने व याकरिता या आॅगोदरची मर्यादा कमी पडत असल्याने लघु सिंचनाकरिता रुपये ६५.०० लाख, कृषियांत्रीकी व शेती अवजाराकरिता रुपये ४५०.०० लाख, दुभती जनावरे व इतर कारणाकरिता रुपये २०.०० लाख अशी एकूण रुपये ५३५.०० लाख फेर कर्ज मर्यादा मंजूर करणेबाबत म.रा. राज्य सहकारी बँकेला विनंती करण्यांत यावी असे ठरले. याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार बँकेचे सरव्यवस्थापक/प्रभारी व्यवस्थापक यांना प्रदान करण्यांत येत आहेत.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ६ (९४) - मे. वाधवानी परमेश्वरी कोल्ड स्टोअरेज प्रा. लिमी., नागपूरचे कोल्ड स्टोअरेज उभारणीकरिता नाबार्डने मंजूर केलेल्या फेर कर्जाची उचल घेण्याबाबत.

ठराव क्रमांक ६ (९४) - मा० अध्यक्ष यांनी सभेला माहिती देतांना सांगितले की, मे० वाधवानी परमेश्वरी कोल्ड स्टोअरेज प्रा० लिमी; नागपूर या कंपनीला नागपूर कृषि उत्पन्न बाजार समितीचे कळमना मार्केट यार्ड येथे कोल्ड स्टोअरेज उभारणीकरिता बँकेने रुपये १७०.०० लाख मुदती

कर्ज मंजूर करून नाबार्डकडे पुढील मान्यतेकरिता प्रस्ताव पाठविला होता. नाबार्डने त्यांचे दिनांक 30.10.2000 चे पत्रक्र. एन.बी.पी.एम. आयसीडी/एसजीएमवाय (कोल्डस्टोरेज)/एम.एस.सी.बी.-07/2000-2001 नुसार सदर प्रस्ताव मंजूर करून या प्रकल्पापोटी राज्य सहकारी बँकेमार्फत बँकेला 9.5% व्याज दराने रुपये 153.00 लाख फेर कर्ज मर्यादा मंजूर केलेली आहे. सदर योजने अंतर्गत फेर कर्ज घेण्याबाबत विचार व्हावा असे वाटते.

विषयावर सविस्तर चर्चा होउन मे. वाधवानी परमेश्वरी कोल्ड स्टोअरेज प्रा. लिमी; नागपूर यांचे कळमना मार्केट यार्ड येथे उभारलेल्या नविन कोल्ड स्टोअरेज करिता नाबार्डने मंजूर केलेल्या रुपये 153.00 लाख फेरकर्ज मर्यादेपोटी कर्जाची उचल करण्याबाबत महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेमार्फत अर्ज करण्यांत यावा. तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व नाबार्डचे मंजूरी पत्रातील सर्व अटी मान्य करून कर्जाची उचल करण्याकरिता आवश्यक कागदपत्रावर सह्या करण्याचे अधिकार बँकेचे सरव्यवस्थापक/प्रभारी व्यवस्थापक यांना देण्यांत येत आहे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

मा. अध्यक्ष यांचे परवानगीने झालेल्या चर्चेच्या वेळी माननीय श्री. भा. वं. शहाणे संचालक म्हणाले की, बँकेच्या नफ्यातून व्याजाची सवलत देउन शेतकऱ्यांना शेती लघुकर्जावर कर्ज रकमेच्या स्लॅबनुसार वेगवेगळे दर न आकारता सरसकट 13% दराने व्याज आकारण्यांत यावे. यावर मा. अध्यक्ष यांनी व्याज दराचे बाबतीत तांत्रिक बाजू व बँकेवर पडणारा आर्थिक बोझा पडताळून पाहूनच विचार करता येईल असे सांगितले.

यानंतर सभेपुढे कोणतेही विषय नसल्याने सभेला उपस्थित मान्यवरांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सरव्यवस्थापक	अध्यक्ष

दि नागपूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को-ऑप. बँक लिमी; नागपूर.

बँकेच्या मा. संचालक मंडळाची सभा मंगळवार दिनांक — ३ एप्रिल २००१ रोजी दुपारी १२.०० वाजता बँकेच्या मुख्य कार्यालयातील सर माधवराव देशपांडे स्मृती सभागृहात बँकेचे अध्यक्ष मा. श्री. सुनील केदार यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या सभेला खालील मान्यवर उपस्थित होते.

- उपस्थित -

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. सुनील केदार | अध्यक्ष |
| २. | मा. सौ. आशाताई महाजन | उपाध्यक्षा |
| ३. | मा. श्री. र. गो. बेग | संचालक |
| ४. | मा. श्री. भा. चं. शहाणे | " |
| ५. | मा. श्री. अ. रा. गुप्ता | " |
| ६. | मा. श्री. अ. य. गुजर | " |
| ७. | मा. श्री. आ. र. देशमुख | " |
| ८. | मा. श्री. सं. लि. घोरे | " |
| ९. | मा. श्री. शा. ग. धवड | " |
| १०. | मा. श्री. वि. रा. हुलके | " |
| ११. | मा. श्री. ना. र. जिभकाटे | " |
| १२. | मा. श्री. वि. जा. राउत | " |
| १३. | मा. श्री. वि. वि. निमजे | " |
| १४. | मा. श्री. ग. के. शाहीर | " |
| १५. | मा. श्री. मो. वि. निमजे | " |
| १६. | मा. श्री. ब. भा. तायवाडे | " |
| १७. | मा. श्री. मु. भि. पन्नासे | " |
| १८. | मा. श्री. अं. शं. धार्मिक | " |
| १९. | मा. श्री. व. क. पारशिवनीकर | " |
| २०. | मा. श्री. चं. तु. समर्थ | " |
| २१. | मा. सौ. सिलाताई कुंभारे | संचालिका |
| २२. | मा. सौ. कुसुमताई किंमतकर | " |
| २३. | मा. श्री. एल. जी. चौधरी | कर्मचारी प्रतिनिधी |
| २४. | मा. श्री. कि. जी. शहाणे | " |
| २५. | मा. श्री. ए. एन. चौधरी | सरव्यवस्थापक |

- अनुपस्थित -

१. मा. श्री. र. पां. गावंडे ✓ संचालक

२. मा. श्री. व. भा. वांढे ✓ "

३. मा. श्री. चं. ल. कोल्हे ✓ "

४. मा. श्री. र. व्यं. निमजे ✓ "

५. मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद, नागपूर.

६. मा. श्री. अ. ना. पोरेड्डीवार प्रतिनिधी, म. रा. सह. बँक म. मुंबई.

७. मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर.

८. मा. विशेष लेखा परिक्षक वर्ग-१, सह. संस्था (बँक), नागपूर.

९. मा. सहाय्यक महाप्रबंधक, नाबार्ड, नागपूर.

१०. मा. विभागीय अधिकारी, महा. राज्य सह. बँक मर्या, विभागीय कार्यालय, नागपूर

---

सभेला सुरुवात होण्यापूर्वी ३१ मार्च २००१ अखेर रुपये ५००/- कोटी ठेवींचे उद्दीष्ट पूर्ण केल्याबद्दल मा० अध्यक्ष महोदय यांनी बँकेचे सरव्यवस्थापक श्री. एन. एन. चौधरी तसेच सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. यावर सरव्यवस्थापक श्री. चौधरी यांनी सभागृहाचे आभार मानले.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयानुसार मा० अध्यक्ष यांनी सभेचे कार्यवाहीस सुरुवात केली.

---

विषय क्रमांक १ – मागील दिनांक १३.२.२००१ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करणे.

ठराव क्रमांक १ – मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर सविस्तर चर्चा होऊन मागील दिनांक १३.२.२००१ रोजी झालेल्या सभेचे प्रतिवृत्त कायम करण्यांत आले.

---

विषय क्रमांक २ – मागील सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीबाबत नोंद घेणे.

ठराव क्रमांक २ – मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. मागील दिनांक १३.२.२००१ रोजीचे सभेत पारीत झालेल्या ठरावाबाबत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची थोडक्यात माहिती मा० सरव्यवस्थापक यांनी दिली. कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीबाबत दिलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यांत आली.

---

विषय क्रमांक ३ - बँकेच्या वैयक्तीक सभासदांचे मृत्युनंतर व हयात असतांना शेअर्स तबदील करुन झालेल्या वैयक्तीक सभासदांचे माहितीबाबत.

ठराव क्रमांक ३ - मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. विषयावर चर्चा करतांना श्री पन्नासे संचालक म्हणाले की, बँकेच्या वैयक्तीक सभासदांचे मृत्युनंतर व हयात असतांना शेअर्स तबदील करुन झालेल्या वैयक्तिक सभासदाबाबत सादर केलेल्या माहितीवरुन वारसदार म्हणून मुलगा, पत्नीचे नावाने शेअर्स तबदील करुन सभासद तर केलेच परंतु वारसदार म्हणून पत्नी मुलगा किंवा मुलगी नसतांना सुध्दा वेगळ्याच दुसऱ्या नावाने शेअर्स तबदील झाल्याचे व सभासदत्व दिल्याचे दिसून येते. तेव्हा यापुढेही मृत झालेल्या सभासदांचे शेअर्स त्यांचे वारसदारांना तबदील करुन सभासदत्व देण्यांत यावे. यावर मा० सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून प्राप्त झालेल्या पत्रांत वैयक्तिक सभासदांचे संदर्भात धोरण स्पष्ट असून वैयक्तिक सभासद न करणे व असलेले वैयक्तिक सभासद कमी करणे व असलेले वैयक्तिक सभासद कमी करणे असे सुचविले असल्याचे मा० अध्यक्ष यांनी सांगितले.

विषयावर चर्चा होउन शासनाचे नियमानुसार व मा० सहकार आयुक्तांचे वैयक्तिक सभासदत्व संदर्भाचे पत्रांतील सुचने नुसार नविन सभासद करता येत नसल्याने व असलेले वैयक्तिक सभासद कमी करायचे असल्याने यापूर्वी बँकेचे शेअर्स तबदील करुन झालेल्या खालील सभासदांचे सभासदत्व वार्षिक साधारण सभेची मान्यता घेउन रद्द करण्यांत यावे आणि वैयक्तिक सभासदांचे बाबतीत सहकार आयुक्तांचे पत्रानुसार बँकेच्या उपविधीत दुरुस्ती करणेत यावी असे ठरले.

१. श्री उदय गंगाधरराव देशमुख
२. " अरविंद अण्णासाहेब किटुके
३. " दिनकर महादेवराव दुरगकर
४ " रमेश जाधवराव माथनकर
५ " रघुनाथ उर्फ राजाभाउ शंकरराव चांदे.
६ श्रीमती लक्ष्मीबाई काशिराव धोटे.
७. श्री. गणेश विष्णुपंत भिडे
८. " महेश विनायकराव चेंडके.

९. श्री रविंद्र माणिकराव भोसले
१०. " संजय दत्तात्रय बुरेगी
११ " आनंद श्रीराम जोशी
१२ " रामदास गोविंदराव देवतकर
१३ " गोविंददास [illegible]लदास चांडक
१४ " वसंत कृष्णरावजी शिरपुरकर
१५ " पद्माकर निळकंठ जोनफळकर
१६ " प्रमोद रामचंद्र काळीकर
१७ " विश्वास मनोहर खोलकुटे
१८ " रमेश अमृतराव पांडे
१९ " विजय त्रिंबकराव बुलदेव
२० " शरदचंद्र यशवंतराव बल्लाळ
२१ " अनंत नारायण नाईक
२२ " अरविंद महादेव दामले
२३ " बबनराव गणपतराव नाईक

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ४ – मुदती ठेवीवरील तिमाही व्याज आकारणी केल्यानंतर किती बोझा पडेल याबाबत माहिती देणे.

ठराव क्रमांक ४ – मा० अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेतील मुदतीबर ठेविर तिमाही व्याजाची आकारणी करून व्याज दिल्यास बँकेवर किती बोझा पडेल याबाबत माहिती मागविली दिनांक १३.२.२००१च्ये सभेतील निर्णयानुसार काढण्यांत आली आहे. सदर माहिती दिनांक २३.२.२००० ला असणाऱ्या ठेवींचे आधारावर काढण्यांत आली असून मुदती ठेवीवर तिमाही व्याजाची आकारणी करून व्याज दिल्यास वार्षिक रुपये २५.०० लाखाच्या अतिरीक्त व्याजाच्या बोझा पडतो. यामुळे बँकेची मुदती ठेवीवरील खर्चाची (Cost of Deposit) ०.१६% ने वाढ संभवते. विषयावरील चर्चेत श्री तायवाडे, श्री बंग, श्री पारशिवनीकर, श्री पन्नासे मा० अध्यक्ष यांनी भाग घेतला व सुचना केल्यात मुदती ठेवीची रक्कम ठेव मॅच्युअर्ड होऊनही ठेवीदाराने उचल न केल्यामुळे ठेवीवर ज्यावेळी मॅच्युअर्ड ठेवीचे रकमेवर मॅच्युरीटीचे तारखेपासून व्याजाची मागणी करेल तेव्हा त्यास बँकेचे सेव्हींग व्याज दराने व्याज आकारून देणेबाबत श्री बंग, श्री पन्नासे यांनी

केलेल्या सुचनावर, माहिती घेउन नंतर सांगणार असल्याचे माननीय अध्यक्ष यांनी सांगितले.

विषयावर सविस्तर चर्चा होउन मुदती ठेवीवरील तिमाही व्याज आकारणी केल्यानंतर किती बोझा पडेल याबाबत दिलेल्या माहितीची सभेत नोंद घेण्यांत आली व बँकेत व्याज आकारणीची नविन पध्दती सुरू न करता सध्या सुरू असलेली मुदती ठेवीवर व्याज आकारणीची प्रचलित पध्दती सुरू ठेवावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ५ — बँकेचे पोटनियम क्रमांक २६ (XVIII) नुसार पुढील कालावधीकरिता व्यवस्थापक समिती, कर्ज उपसमिती व इतर उपसमितीची नियुक्ती करणे.

ठराव क्रमांक ५ — मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, पोटनियमातील तरतुदीनुसार दरवर्षी ३१ मार्च नंतर होणाऱ्या पहिल्या संचालक मंडळाचे सभेत नविन समितीची नियुक्ती करावयाची आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होउन ३१ मार्च २००१ नंतरचे पुढील कालावधीकरिता बँकेचे पोटनियम क्रमांक २६ (XVIII) नुसार व्यवस्थापक समिती, कर्ज उपसमिती व इतर उपसमितीची नियुक्ती करणे करिता मा. अध्यक्ष यांना अधिकार देण्यात येत आहे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

---

विषय क्रमांक ६ — बँकेचे पोटनियम क्रमांक २६ (XXVI) नुसार पुढील कालावधीकरिता बँकेला संलग्न असलेल्या संस्था व इतर संस्थावर प्रतिनिधी नियुक्त करणे.

ठराव क्रमांक ६ — मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, बँकेच्या पोटनियमातील तरतुदीनुसार ३१ मार्च नंतरचे पुढील कालावधीसाठी बँकेला संलग्न असलेल्या संस्थांवर प्रतिनिधी नियुक्त करायचे आहेत.

विषयावर सविस्तर चर्चा होउन बँकेचे पोटनियमातील क्रमांक २६ (XXVI) नुसार ३१ मार्च २००१ नंतरचे पुढील कालावधी करिता बँकेला संलग्न असलेल्या संस्था व इतर संस्थांवर प्रतिनिधी नियुक्त करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष यांना देण्यांत येत आहे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्रमांक ७ – नागपूर जिल्हा शेतकरी सहकारी सुत गिरणी मर्या; हिंगणा यांना रुपये ९६१८२३/- बँक गॅरंटी उपलब्ध करून देणे याबाबत दिनांक ७.३.२००१ रोजी केलेल्या सक्र्युलर ठरावास मंजूरी देणे.

ठराव क्रमांक ७ – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, नागपूर जिल्हा शेतकरी सहकारी सुत गिरणी मर्या. हिंगणा यांनी ई.पी.सी.जी. योजने अंतर्गत खरेदी केलेल्या मशिनरीची डिलीव्हरी घेणेकरिता डेप्युटी कमिश्नर ऑफ कस्टम, मुंबई यांचेकरिता रुपये ९६१८२३/- ची गॅरंटी आवश्यक असल्याचे दर्शवून बँकेची महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमी., ला १००% तारणावर काउंटर बँक गॅरंटी मिळणेकरिता अर्ज केला होता. दिनांक ७.३.२००१ ला गिरणीचे कॅश क्रेडीट (पी) खात्याला रुपये ६.०० कोटी मंजूर मर्यादेपोटी कर्जबाकी नसल्याने तसेच गिरणीच्या खात्याला रुपये ६.०० कोटी मंजूर मर्यादेपोटी कर्जबाकी नसल्याने तसेच गिरणीच्या सुताच्या गाठी रुपये ८.०० कोटी किंमतीच्या बँकेच्या गोडाउन मध्ये तारे गहाणांत असल्याने गिरणीची तातडीची गरज व संचालक मंडळाची सभा नजीकच्या काळांत नसल्याचे विचारांत घेउन खालील प्रमाणे दिनांक ७.३.२००१ ला सक्र्युलर ठराव करून काउंटर बँक गॅरंटी देउन बँक गॅरंटी देण्याकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला दिनांक ७.३.२००१ रोजी विनंती करण्यांत आली आहे.

– दिनांक ७/३/२००१ रोजी करण्यांत आलेला सक्र्युलर ठराव. –

नागपूर जिल्हा शेतकरी सहकारी सुत गिरणी मर्या; हिंगणा यांची परदेशातुन आयात केलेली मशिनरी मुंबई येथे कस्टम ऑफिसला आलेली असून ती सोडवायची आहे. डॅमरेज लागू नये याकरिता मुदतीचे आंत मशिनरी सोडविणे आवश्यक असल्याने नागपूर जिल्हा शेतकरी सहकारी सुत गिरणी मर्या; हिंगणा यांना बँक गॅरंटी रुपये ९६१८२३/- महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेतून डेप्युटी कमिश्नर ऑफ कस्टम, मुंबई यांचेकरिता उपलब्ध करून द्यावयाची आहे. याकरिता काउंटर गॅरंटी देणेसाठी आपल्या बँकेचा ठराव पारित करणे आवश्यक आहे. नजिकच्या काळांत मा. संचालक मंडळाची सभा नसल्याने नागपूर जिल्हा शेतकरी सहकारी सुत गिरणी मर्या; हिंगणा यांची तातडीची गरज विचारांत घेता यासाठी खालील सक्र्युलर ठराव करणे आवश्यक आहे.

RESOLUTION

"This meeting of Board of Directors hereby resolves to offer counter guarantee for the Bank guarantee of Rs. 9,61,823/- to Nagpur Zilla Shetkari Sahakari Soot

Girni Ltd, Hingna to be issued by the Maharashtra State Cooperative Bank Ltd, favouring Deputy Commissioner of Customs, Mumbai"

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ८ — बँकेच्या मुख्य कार्यालयासह सर्व शाखा संगणीकृत करणेकरिता मे. काळे कंसलटंट लिमी; यांचेकडून आलेल्या कोटेशनचा विचार करणे.

ठराव क्रमांक ८ — मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, मुख्य कार्यालय स्तरावरील कामाचे तालुका स्तरावर विकेंद्री करण करण्याचे दिनांक १८.१.२००१ रोजीचे व्यवस्थापक समितीचे सभेत ठरल्यानुसार सद्या मौदा शाखेत प्रायोगिक स्तरावर काम करित असलेले मे. काळे कंसलटंटस् लिमी; यांचेशी चर्चा करण्यांत आली. बँकेच्या संपूर्ण शाखा संगणीकृत करण्याचे प्रकरणावर लक्ष केंद्रित करून मे. काळे कंसलटंटस् लिमी, या संस्थेला टर्न की प्रोजेक्ट (Turn Key Project) देण्याबाबत कोटेशन मागविण्यात आले. त्याप्रमाणे त्यांनी दिनांक १३.३.२००१ ला बँकेच्या सर्व शाखांच्या संगणकीकरणाकरिता खालील प्रमाणे कोटेशन दिलेले आहे.

१. सद्यस्थितीतील SGL 7 वर आधारीत प्रोग्रॅमवर बँकेला सर्व अपेक्षित सर्व बाबी अंतर्भूत करुन ----- रुपये १.५० कोटी
२. ओरॅकल (ORACLE) प्लॅटफार्म सर्व बाबी अंतर्भूत करुन ---------- रुपये २.०० कोटी
3. जावा (JAVA) प्लॅटफार्म सर्व बाबी अंतर्भूत करुन -- रुपये ४.९५ कोटी.

विषयावर सविस्तर चर्चा होउन बँकेच्या सर्वच शाखांमध्ये संगणीकरण करायचे झाल्यास मे. काळे कंसलटंटस् लिमी; तसेच इतर बँकींग सॉफ्टवेअर कंपन्यांचे कोटेशन मागवून व याबाबत अभ्यास करुन निर्णय घेण्याचे अधिकार मा. अध्यक्ष यांना देण्यांत येत आहे असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ९ - सहकार खात्याने मागणी केल्यानुसार मौदा तालुक्यातील चाचेर व कोंढामेंढी या शाखांकरिता अद्यावत तारखेचा ठराव पाठविणे बाबत विचार करणे.

ठराव क्रमांक ९ - मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की मौदा तालुक्यातील चाचेर व कोंढामेंढी येथे शाखा उघडणे बाबत मंजुरी संदर्भात बँकेने दिनांक १०.२.२००० ला सहकार

खात्यास सन १९९४ साली पारीत केलेला ठराव व अद्यावत माहितीसह प्रस्ताव सादर केला होता. सहकार खात्याने त्यांचे दिनांक २३.६.२००० चे पत्रानुसार अद्यावत तारखेच्या मा. संचालक मंडळाचे ठरावासह प्रस्ताव पाठविण्यास कळविले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा करतांना श्री गुजर, संचालक म्हणाले की, चाचेर व कोदामेंढी ता. मौदा येथे शाखा उघडणे संदर्भात सहकार खात्याने मागणी केल्यानुसार नविन ठरावासह प्रस्ताव पाठवून सहकार खात्यास परवानगी मिळणेस्तव विनंती करण्यांत यावी. विषयांवर सविस्तर चर्चा होऊन मौदा तालुक्यातील चाचेर व कोदामेंढी येथील परिसरातील शेतकरी सभासदांना व इतर ग्राहकांना बँकींग सेवा त्वरित उपलब्ध करून देण्याचे दृष्टीने बचतीची सवय वृध्दिंगत व्हावी या दृष्टीने चाचेर व कोदामेंढी येथे शाखा उघडण्यासाठी परवानगी मिळणेस्तव सहकार खात्याकडे ठरावासह प्रस्ताव पाठवून विनंती करणेत यावी असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १० – बँकेचे उपविधी क्रमांक ५७(१) मध्ये दुरूस्ती करणेबाबत.

ठराव क्रमांक १० – मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले व सभेला माहिती देतांना सांगितले की, या २०००-२००१ वर्षाकरिता बँकेच्या सभासद भागधारकांना २०% दराने लाभांश वितरणाच्या बँकेचा मानस विचारांत घेऊन मा. विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना २०% दराने लाभांश वितरणासाठी परवानगी मिळावी म्हणून विनंती करण्यांत आली. परंतु मा. विभागीय सहनिबंधक यांनी त्यांचे दिनांक १५ मार्च २००१ रोजीचे पत्राप्रमाणे बँकेच्या भागधारकांना त्यांचे भाग भांडवलावर सन २०००-२००१ करिता २०% दराने लाभांश वितरणास परवानगीबाबत लाभांश मंजुर करण्याचे अधिकार साधारण सभेचे आहेत, तेव्हा असा प्रस्ताव साधारण सभेने मंजुर केलेल्या ठरावासह असणे आवश्यक आहे असे कळविले आहे.

बँकेच्या सध्याचे उपविधीप्रमाणे १५% पेक्षा जास्त दराने लाभांश वितरीत करता येत नाही. याकरिता उपविधीमध्ये दुरूस्ती करणे आवश्यक आहे. विषयावर सविस्तर चर्चा होऊन उपविधी क्रमांक ५७(१) मध्ये खालील प्रमाणे दुरूस्ती करण्याकरिता वार्षिक साधारण सभेची मान्यता घेऊन प्रस्ताव मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था नागपूर यांचेकडे मंजुरीसाठी पाठविणेत यावा असे ठरले.

Wording of Existing Byelaws No. 57(1) — To pay dividend on the fully paidup Shares at a rate 12% and up to 15% with prior permission of the Registrar.

Amendment proposed — To pay dividend on the fully paidup shares up to limit fixed in the M.C.S. Act 1960, under section 67.

Wording of the byelaws after Amendment — To pay dividend on the fully paid up shares upto the limit fixed in the M.C.S. Act 1960 under section 67.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक ११ — मे. वाधवानी परमेश्वरी कोल्ड स्टोअरेज प्रा. लिमिटेड नागपूरचे मुदती कर्जावरील व्याजदराबाबत.

ठराव क्रमांक ११ — मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले, सभेला माहिती देतांना सांगितले की, मे. वाधवानी परमेश्वरी कोल्ड स्टोअरेज प्रा. लि., नागपूर या कंपनीला कृषि उत्पन्न बाजार समिती, कळमना यार्ड, नागपूर येथे नविन कोल्ड स्टोअरेज उभारणीसाठी बँकेने रुपये १७००.०० लाख मुदती कर्ज द.सा.द.शे. १५% व्याजदराने मंजूर केले व सदर मंजूर कर्ज प्रकरण मान्यतेसाठी नाबार्डकडे पाठविण्यांत आले. परंतु नाबार्डने दिनांक २०.२.२००१ चे पत्रानुसार लाभार्थीला कर्जावर लावलेल्या १५% व्याजदरास आक्षेप घेतला असून कॅपिटल इन्व्हेस्टमेंट सबसिडी योजनेअंतर्गत कर्जपुरवठा करणेसाठी अंतिम लाभधारकास १४% प्रमाणे व्याजदर आवश्यक असल्याने कर्ज मंजूरी पत्रांत दुरुस्ती घेवुन तसे मंजुरीपत्र पाठविण्यास कळविले आहे.

विषयावर सविस्तर चर्चा होवुन मे. वाधवानी परमेश्वरी कोल्ड स्टोअरेज प्रा. लि., नागपूर यांना मंजुर केलेल्या मुदती कर्जावरील व्याज दर द.सा.द.शे. १२% असु द्यावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर

---

विषय क्रमांक १२ — कर्जावरील व्याजदरांत बदल करणे बाबत विचार करणे.

ठराव क्रमांक १२ — मा. अध्यक्ष यांनी विषयाचे वाचन केले. दिनांक ११.२.२००० चे मा. संचालक मंडळाचे सभेत निर्णय घेवुन कर्जावरील व्याज दरांत सुधारणा करुन दिनांक १५.२.२००० पासुन अमलांत आणले. वाणिज्य व नागरी बँकातील व्यवसायाची स्पर्धा विचारांत घेता आपले बँकेचे कर्जावरील